# MITHI RIVER DEVELOPMENT AND PROTECTION AUTHORITY (MRDPA)



# Compendium of Authority Meeting

# MITHI RIVER DEVELOPMENT & PROTECTION AUTHORITY

# SEPARATOR

Minutes of 5th Authority Meeting

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
अभियांत्रिकी विभाग (मिठी नदी कामे)
मुंबई
दिनांक : १२/०६/२००८

दि. ५.०५.२००८ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची ५ वी बैठक घेण्यात आली असून या बैठकीचे प्रारुप इतिवृत्त मंजूरीस्तव पृष्ठ क्र.1/ ते 5/ वर ठेवण्यात आले आहे.

कृपया प्रारुप इतिवृत्त मंजूरीस्तव सविनय सादर.

मुख्य अभियंता
(मिठी नदी कामे)

मुख्य सचिवांचे कार्यालय
24 JUN 2008

महानगर आयुक्त
प्रधान सचिव (नवि.)
मुख्य सचिव

(मा. मुख्यमंत्री)

अभियांत्रिकी विभाग

मिठी नदी कामे

दिनांक ११/०७/२००८

विषय : दि.०५/०५/२००८ रोजी मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मिठी नदी व संरक्षण प्राधिकरणाच्या ५ व्या बैठकीचे इतिवृत्त.

दि. ०५/०५/२००८ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या ५ व्या बैठकीचे इतिवृत्त मा. मुख्यमंत्री यांनी मंजूर केले असून त्याची प्रत मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या सदस्यांना पाठविण्यासाठी मसुदा पत्र तयार करुन पृ.क्र. 13 /cs वर मा. महानगर आयुक्त यांच्या मंजूरीसाठी ठेवण्यात आले आहे.

कृपया मंजूरीस्तव सविनय सादर.

अधीक्षक अभियंता
(मिठी नदी कामे)

मुख्य अभियंता (मिठी नदी कामे)

मुख्य अभियंता
मुं. म. प्र. वि. प्रा. (मिठी नदी कामे)
जावक क्रमांक 435
दिनांक: 11/7/08

महानगर आयुक्त

C.E.MRW

E:\My Documents\SUHAS\minutes of meeting\5 05 08 meeting\note for 05.05.08 meeting 11.07.08.doc

दिनांक ०५/०५/२००८ रोजी मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या ५ व्या बैठकीचे प्रारुप इतिवृत्त

सर्वप्रथम सदस्य सचिव, मिठी नदी, विकास व संरक्षण प्राधिकरण यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले आणि त्यानंतर मा. अध्यक्षांच्या संमतीने विषयसूची नुसार सभेस सुरुवात होण्यापूर्वी प्राधिकरणाच्या दिनांक २०/०४/२००७ रोजी झालेल्या चौथ्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये मिठी नदी विकास आराखडयास प्रकल्प संचालक, मि.न.वि.प्रा. यांनी मान्यता दयावी अश्या स्वरुपाची चर्चा चौथ्या बैठकीत झाली नसल्याने हा मुद्दा वगळणेबाबत महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा. यांनी विनंती केली. महानगर आयुक्त मुं.म.प्र.वि.प्राधिकरण व आयुक्त महापालिका, मुंबई यांचेपेक्षा प्रकल्प संचालक, मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण हे पुष्कळच कनिष्ठ दर्जाचे (कार्यकारी अभियंता अवर सचिव दर्जाचे) अधिकारी असल्यामुळे दोन्ही आयुक्तांनी तसेच इतर वरिष्ठ अधिका-यांनी प्रकल्प संचालक यांचेकडे अहवाल सादर करणे व त्यांची मंजूरी घेणे हे संयुक्तीक होणार नाही, तसेच यापुढे मिठी नदी विकासाचा व्यवहार्य दृष्टीकोनातून असणा-या सिमांकन आराखडयास अंतीम मान्यता देणेचे अधिकार मुख्य सचिव पातळीवर ठेवणेबाबत विनंती केली. हयावर चर्चा होवून मिठी नदी विकासाचा सिमांकन आराखडयास अंतिम मान्यता Empowered Committee कडून घेण्यात यावे असे आदेश मा. मुख्यमंत्री यांनी दिले.

आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा. यांनी मिठी नदीच्या आतापर्यंत पूर्ण करण्यात आलेल्या कामाविषयी थोडक्यात माहिती दिली. आयुक्तांनी असे सांगितले की सुमारे १७ लक्ष घन मीटर गाळ काढण्याच्या कामापैकी आतापर्यंत सुमारे १४ लक्ष घन मीटर एवढा गाळ काढण्यात आला आहे. तसेच संरक्षक भिंतीच्या एकूण कामापैकी २ कि.मी. एवढे काम पावसाळयापूर्वी करण्याचे नियोजन आहे. याशिवाय मिठी नदी मधील परिघ खाडी परीसरात सा.क्र.३५०० ते ४६०० मी. या लांबीमध्ये बांद्रा-कुर्ला संकुलाच्या बाजूस व्यवहार्य रुंदीचा मरीन प्लॅटफॉर्म तयार करुन त्याचे खालून नदीचा प्रवाह जाऊ देणे शक्य आहे का? याचा अभ्यास सल्लागारा मार्फत करणेचे काम चालू आहे. जर ते शक्य झाले तर परिघ खाडी येथील बरीचशी पुनर्वसनाची कामे वाचू शकतील व पर्यायाने सुमारे २००० झोपडया काढण्याची आवश्यकता भासणार नाही. याप्रमाणेच वाकोला नाल्यामध्ये वाल्मिकी नगर भागात मरीन प्लॅटफॉर्म करणे शक्य आहे काय? याचा अभ्यास करण्यात येत आहे.

बाब सूचीवरील इतर बाबींवर चर्चा होण्याआधी मिठी नदी संदर्भात विविध मान्यवर उपस्थितांनी आपली बाजू मांडली. मा. श्री कृपा शंकर सिंह यांनी वाकोला नाल्यावर वाल्मिकी नगर येथे अद्याप रुंदीकरण झाले नसल्याचे निदर्शनास आणले. मा. श्री. नबाब मलीक यांनी मिठी नदी मध्ये घन कचरा टाकला जाणार नाही याबाबत काळजी घेण्याची सूचना दिली. मा. श्री नसीम खान यांनी विहार लेक येथून जास्तीचे पाणी पावसाळयामध्ये न सोडण्याची सूचना दिली, जेणेकरुन मिठी नदीवर पूर सदृश्य परिस्थिती निर्माण होणार नाही. मा. श्री. जनार्दन चांदूरकर यांनी अतिवृष्टी दरम्यान दुतर्फा झोपडयामध्ये पाणी शिरत असल्याचे निदर्शनास आणले. यावर मा. श्री. नारायण राणे यांनी सदर बाब ही नैसर्गिक बाब असल्यामुळे व झोपडयाची पातळी ही हाय टाईड लेव्हलपेक्षा खाली असल्यामुळे स्लुईस गेट बसविण्यासंबंधी विचार करण्यात आला.

श्री. पुरंदरे Retired Jt. Director, CWPRS यांनी स्लुईस गेट बसविलेने कोणताही फायदा होणार नाही असे प्रतिपादीत केले. यावर मुख्य सचिव यांनी याबाबत यापूर्वी बरीच चर्चा झाली असल्यामुळे चर्चे अंती स्लुईस गेट बसविण्याचे निश्चित करण्यात आले असल्याचे सांगितले. त्यावर मा. मुख्यमंत्री यांनी याबाबत एम्पॉवर कमिटीमध्ये निर्णय घ्यावा असा आदेश दिला.

यानंतर विमान प्राधिकरणा मधून वाहणा-या मिठी नदीच्या आखणी बाबत चर्चा झाली. यावर मा. श्री. नसीम खान व मा. श्री.नबाब मलीक यांनी विमान प्राधिकरणाने त्यांच्या आराखडयाची रुंदी अजुनपर्यंत न वाढविल्यामुळे मिठी नदीची रुंदी २७ मी. असल्याचे निदर्शनास आणले. वास्तविक ही रुंदी ४० मी. असणे आवश्यक आहे. त्यानंतर विमान प्राधिकरणाचे प्रतिनिधी यांनी अशी माहिती दिली की, सदर काम करणेकरीता विमानतळ बंद करणे आवश्यक असल्यामुळे त्यासाठी आय.आय.टी. या संस्थेला अभ्यास करण्याचे सोपविण्यात आले. सदर अभ्यासानंतर रुंदीकरण करणे प्रस्तावित असल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीमध्ये विमान प्राधिकरणाने मागील २ वर्षात काही कार्यवाही न केल्याने व त्यामुळे पूरसदृष्य परिस्थिती निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले. मा. मुख्यमंत्री यांनीही याबाबत नापसंती व्यक्त केली व पुढील काम त्वरीत करण्याचे निर्देश दिले.

मिठी नदी व वाकोला नाला रुंदीकरणाबाबत व्यवहार्य असलेल्या विकास आराखडयाचा सीमारेखांकन नकाशा महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा. यांनी बैठकीसमोर सादर केला व त्यास त्वरीत मान्यता देणे बाबत विनंती केली. परंतु उपस्थित आमदार मा. श्री. नसीम खान, मा.

श्री.नबाब मलीक, मा. श्री. जनार्दन चांदूरकर, मा. श्री.कृपाशंकर सिंह यांनी या सीमारेखांकना संबंधी अधिक चर्चा करण्याची विनंती केली. यावर मा. अध्यक्षांनी याबाबत मुं.म.प्र.वि.प्रा. मध्ये महानगर आयुक्त व महानगर पालिका आयुक्त यांनी सर्व आमदारांसमवेत त्वरीत एक बैठक घेऊन व तज्ञ समितीने सुचविलेल्या सीमारेषेवर सांगोपांग विचार करुन व्यवहार्य सीमारेखांकन करण्याची सूचना दिली. त्यानुसार सदर बैठक दि.१३.५.२००८ रोजी सकाळी ११.०० वाजता मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या समितीच्या हॉलमध्ये घेण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर मा. मुख्यमंत्री यांनी सुचविल्याप्रमाणे व्यवहार्य विकास आराखडयाच्या सिमारेखांकनाचा नकाशा प्राधिकरणासमोर सादर करण्याची सूचना दिली. त्यानंतर उपस्थित मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठकीची समाप्ती झाली.

## मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाच्या ५ व्या बैठकीचा कार्यवाही अहवाल

| अ. क्र. | सभेत चर्चा केलेले विषय | कार्यवाही करणारी संस्था | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १. | पुनर्वसनाची आवश्यकता कमी करण्याच्या दृष्टीने मरीन प्लॅटफॉर्मबद्दल अभ्यास करणे | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | सदर अभ्यास केल्यानंतर असे आढळले की, मरीन प्लॅटफॉर्म जास्त फायदेशीर ठरत नसून, जास्त खर्चिक देखील आहे. त्यामुळे मुं.म.प्र.वि.प्रा. ने मरीन प्लॅटफॉर्म ऐवजी नदीचे रुंदीकरण व संरक्षण भिंत बांधण्याचे प्रस्ताविले आहे. |
| २. | माहीम कॉजवेकडे स्लुईस गेट बसविण्यासंबंधी विचार करणे आणि त्यावर Empowered Committee मध्ये निर्णय घेणे | Empowered Committee | यासंबंधी यापूर्वीच झालेल्या चर्चेप्रमाणे, तसेच दि. ०३ जानेवारी, २०१० रोजी मा. मुख्य सचिव, अध्यक्ष Empowered Committee यांच्याबरोबर झालेल्या चर्चेमध्ये स्लुईस गेट बसविणेचा प्रस्ताव अयोग्य ठरविण्यात आला आहे. |
| ३. | विमानतळामध्ये असणा-या मिठी नदीवरील पुलाचे रुंदीकरण | विमानतळ प्राधिकरण | जानेवारी, २०१० मध्ये झालेल्या मा. मुख्य सचिव यांच्याकडील चर्चेमध्ये विमानतळ प्राधिकरणाने आवश्यक असलेले अभ्यास करुन लवकरात लवकर त्यांच्या भागातील रुंदीकरण करावे असे निर्देश दिले. |
| ४. | मिठी नदी व वाकोला नाला रुंदीकरणाबाबत महानगर आयुक्त व महानगरपालिका आयुक्त यांनी सर्व आमदारांसमवेत बैठक घेऊन व्यवहार्य सीमा रेखांकन करुन प्राधिकरणासमोर सादर करणे | मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण | सदर बैठक प्राधिकरणाच्या ५ व्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे १३ मे, २००८ रोजी झाली. बैठकीत चर्चा केल्याप्रमाणे मिठी नदी व वाकोला नाल्याचे रुंदीकरणाचे व्यवहार्य सीमा रेखांकन करुन सदर आरखडा प्राधिकरणाच्या ६ व्या बैठकीमध्ये सादर करण्यात येत आहे. |